

# कै. श्री. वरदानंद भारती : काही आठवणी

- डॉ. जयंत नारळीकर, पुणे.

कै. श्री. वरदानंद भारती (पूर्वाश्रमीचे वैद्य श्री अनंतराव आठवले) यांचा परिचय होण्याचा योग आला १९६६ मध्ये. माझे लग्न नुकतेच ठरले होते व माझ्या वधूपक्षाच्या आप्त मित्रांशी नव्याने ओळखी होत होत्या. वैद्य श्री आठवले त्यावेळी प्राचार्यांचे पद भूषवीत होते आणि आयुर्वेद रसशाळेमागच्या घरात रहात होते. त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व तेव्हाच मनात भरले, तर त्यांच्या बोलण्यातून वैद्यकशास्त्र आणि अध्यात्म दोन्ही क्षेत्रातील ज्ञानाची झलक पहायला मिळाली. त्यानंतर लवकरच मी आणि माझी पत्नी (पूर्वाश्रमीची मंगला राजवाडे) केंब्रिजमध्ये संसार थाटायला निघालो तेव्हा अनेकांनी अनेक उपहार दिले. श्री अनंतरावांनी दिलेली भेट वैद्याला साजेशी होती. अनेक आयुर्वेदिक औषधांच्या डब्यांचा संचय त्यांनी दिला... संजीवनी, आमपाचक वटी, नागगुटी... आदी अनेक औषधे त्यांत होती. परदेशी स्वास्थ्य संभाळण्याच्या दृष्टीने ही भेट फार मोलाची ठरली.

काही वर्षांनी भारतात स्थायिक झाल्यावर श्रीयुत आठवले यांची गाठ पुष्कळदा पडे. त्यांचे प्रवचन, कीर्तन ऐकण्याचे योगही आले. रसाळ वाणीत अनेक उपमा - उदाहरणांद्वारे किंवा गोष्टीरूपाने प्रबोधन करायची त्यांची हातोटी होती. त्यामुळे ऐकणाऱ्याला ऐकत राहावेसे वाटावे हे त्यांच्या प्रेक्षकवर्गाकडे पाहिल्यास सहज पटे. वेळप्रसंगी विरोधी मतांचा ते खरपूस समाचारही घेत. वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसूमादपि हे वर्णन त्यांना लागू पडेल.

त्यांचा विषय अध्यात्म असला तरी विज्ञानातून दिवसेंदिवस मिळणाऱ्या माहितीबद्दल त्यांना कुतुहल असे. माझी त्यांची भेट होई तेव्हा नुकत्याच छापून आलेल्या कुठल्यातरी वैज्ञानिक शोधाबद्दल किंवा घटनेबद्दल ते मला आवर्जून विचारीत. विज्ञानाची शिकवण आणि परंपरागत आध्यात्मिक ज्ञान यांच्यात सांगड घालायचा त्यांचा प्रयत्न असे- कृष्णविवर, विश्वाचे प्रसरण, क्वांटम सिद्धांत आदीबद्दलही चर्चा होत असे.

कधी कधी मी पण काही शंका विचारीत असे. मर्यादापुरूषोत्तम रामाने वालीचा वध केला, सीतेचा त्याग केला किंवा शम्बूकाला ठार मारवले ते योग्य केले नाही असे मी म्हटल्यावर ते त्यावेळच्या समाजरचनेत त्याकाळच्या धार्मिक प्रथांचा आधार देऊन ह्या कृतीचे समर्थन करीत. अर्थात आजच्या नियमाप्रमाणे ते समर्थनीय ठरणारे नाही.

त्यांनी संन्यास घेतल्यावर देखील ते कधी पुण्यात आले (आणि मी पुण्यात असलो तर) आमची गाठ पडे व शक्य असल्यास चर्चाही होई. त्यांना पूजनीय मानणाऱ्यांची संख्या पुष्कळ मोठी असली तरी त्यांनी साधेपणा स्वीकारला... डामडौल, थाटमाट केला नाही हे सतत जाणवे. आपल्या आध्यात्मिक आदर्शाशी ते सतत एकनिष्ठ राहिले, त्यांना दर्शन दिलेल्या वरदनारायणात विलीन झाले...

त्यांच्या स्मृतीला माझे नम्र अभिवादन.

## विचारधन

**युद्धनीति :** कोणत्याही परिस्थितीत शाहण्यांनी दुर्बलातल्या दुर्बल शत्रूलाही अवसर देऊ नये आणि स्वतःला मिळालेली संधी सोडू नये. विशेषतः शत्रू अडचणीत आहे, असे पाहूनच त्याच्यावर घाव घातला पाहिजे. दुष्टाला, अन्यायाने वागणाऱ्याला, मिळेल ती संधी गाठून ठार करणे हेच विचारवंताला, पंडिताला शोभणारे आहे. असे वागणे धर्माला धरून आहे आणि यशस्करहि आहे.